# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

**सन २०२४-२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**शुक्रवार, दिनांक ५ जुलै, २०२४**

## सार्वजनिक बांधकाम विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ३८**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एच-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१६, गृहनिर्माण**<br>**रूपये:- २,७३,७४,६९,०००/-**<br>**श्री. संजय जगताप** |
| (१) | ६४६० | १० | घाटकोपर (पुर्व), मुंबई येथे शासकीय वसाहतीत एकूण सहा इमारती असून प्रत्येक इमारती मध्ये ४ लिफ्ट असून त्यामध्ये काही नागरीक गुटखा, तंबाखू खावून थुंकत असल्याने लिफटमध्ये दुर्गंधी पसरत असल्याचे निदर्शनास येणे, सदरहू लिफ्ट मधून शासकीय कर्मचारी/लहान मुले वयोवृध्द ये-जा करत असल्याने सदरहू दुर्गंधीमुळे शासकीय वसाहतीमधील कर्मचाऱ्यांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत असणे, सदरहू प्रकार थांबविण्याकरीता बांद्रा शासकीय वसाहतीत लिफ्टमध्ये जसे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत त्याचप्रमाणे घाटकोपर शासकीय वसाहतीतील लिफ्टमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची सर्व शासकीय कर्मचाऱ्यांची मागणी असणे, त्यानुसार सदरहू प्रकारास आळा घालण्यासाठी घाटकोपर वसाहतीतील सर्व लिफ्टमध्ये त्वरीत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विनोद निकोले** |
| (२) | ६४१५ | १०० | घाटकोपर (पुर्व), मुंबई येथे शासकीय वसाहतीतील लिफ्टमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत, घाटकोपर (पश्चिम), मुंबई येथे शासकीय वसाहतीत एकूण सहा इमारती असून प्रत्येक इमारती मध्ये ४ लिफ्ट असून त्यामध्ये काही नागरीक गुटखा, तंबाखू खावून थुंकत असल्याने लिफटमध्ये दुर्गंधी पसरत असल्याचे निदर्शनास येणे, सदरहू लिफ्ट मधून शासकीय कर्मचारी/लहान मुले वयोवृध्द ये-जा करत असल्याने सदरहू दुर्गंधीमुळे शासकीय वसाहतीमधील कर्मचाऱ्यांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत असणे, सदरहू प्रकार थांबविण्याकरीता बांद्रा शासकीय वसाहतीत लिफ्टमध्ये जसे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत त्याचप्रमाणे घाटकोपर शासकीय वसाहतीतील लिफ्टमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची सर्व शासकीय कर्मचाऱ्यांची मागणी असणे, त्यानुसार सदरहू प्रकारास आळा घालण्यासाठी घाटकोपर वसाहतीतील सर्व लिफ्टमध्ये त्वरीत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (३) | ६४२१ | १० | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुंबई बजेटसाठी मुंबई सा.बा. विभागाचे अधिक्षक बनगोसावी यांनी स्पीलवर्क प्रोग्रॅमच्या 10टक्यामुहून अधिक सुमारे 685 कोटीचा स्पीलवर्क कार्यक्रम मंजुर करुन यामध्ये मोठ्या प्रमाणात कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, सार्वजनिक बांधकाम मंडळाच्या मुंबई बजेटमध्ये शिल्लक कामांच्या लेखा शिर्षाअंतर्गत कार्यक्रमात (स्पीलवर्क प्रोग्रॅम) मागील अपूर्ण बजेटच्या निधीची तरतुदकरुनच शिल्लक रक्कमेची कामे करण्यात येत असताना, मागील वर्षी मंजुर झालेल्या उपलब्ध निधीच्या (नॉन प्लॅनेड वर्क) १० टक्के पेक्षा जास्त कामे मंजूर करता येत नसतानाही यामध्ये मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करुन भ्रष्टाचार केल्याचा प्रकार उघड होणे, सदरहू मंडळा अंतर्गत कार्यरत असलेल्या विभागाकडून खरा स्पीलवर्क कार्यक्रम मंडळाकडून पाठविण्यात न येणे, विभागाच्या कार्यकारी अभियंता लेखा परिक्षक, निविदा लिपीक, यांचेबरोबर बैठक घेऊन निविदा नोंदणीमधील कामाचा आढावा घेऊन पडताळणी केली असता स्पीलवर्क कार्यक्रमाचा हा आकडा ८०० ते 830 कोटी पर्यंत जाण्याची धक्कादायक बाब निदर्शनास येणे, मुंबई मंडळाचे बजेट 250 ते 350 कोटी असताना सासनाने स्पीलवर्क कार्यक्रमांतर्गत 685 कोटी रुपये इतका निधी मंजूर करण्यात येणे, त्यानंतर सर्व विभागाचे कार्यक्रम मंजूर करण्यात येणे, यामुळे मुंबई मंडळ अधिक्षक अभियंता यांचेकडून फोर मोठ्या प्रमाणात शासकीय निधीचा अपहार करुन भ्रष्टाचार करण्यात आल्याची व येत असल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे. सदरहू प्रकरणाची राज्य शासनाने अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रक मंडळ, नाशिक यांना चौकशी करण्याच्या सूचना दि.11.12.2023 रोजीच्या सुमारास देऊनही अद्याप यावर कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, सदरहू प्रकरणी शासनाचे उच्च अधिकारी आर्थिक संगनमताने भ्रष्टाचार दडपून टाकण्यात येणे, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन दोषींविरुद्ध कारवाई करण्याची आवश्यकता. |
| | | | **मागणी क्रमांक: एच-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**रूपये:- ४,४२,७२,५१,०००/-**<br>**ॲड. अशोक पवार** |
| (४) | ६४०९ | १० | मौजे विठ्ठलवाडी, ता.शिरुर व मौजे सांगवी सांडस, ता.हवेली, जि.पुणे या गावादरम्यान ( प्रजिमा ३८,साखळी क्रमांक ६/३००) भिमा नदीवर पुलाचे बांधकाम करण्याकरिता शासनाकडे मा.लोकप्रतिनिधी, शिरुर यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्या माहे डिसेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास मागणी करणे, भिमा नदीवर कोल्हापूर पद्धतीचा के.टी. वेअर असून या के.टी वेअर वरुन वाहतूक होत असणे, हा |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | केटी वेअर अत्यंत धोकादायक असल्याने या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसणे, या ठिकाणी मोठ्या पुलाचे बांधकाम झाल्यास दोन्ही बाजूच्या नागरिकांची १५ किमी अंतराची बचत होणार असणे, त्यामुळे सदर ठिकाणी मोठा पुल बांधणे अत्यंत गरजेचा असणे, याकरिता शासनाकडे वारंवार मागणी करुन कोणतीही कार्यवाही न होणे याकरिता शासनस्तरावरुन कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | ६४१४ | १० | हवेली तालुक्यातील ( जि.पुणे) येथील कोरेगाव भिवरी वाडेबोल्हाई डोंगरगाव त पेरणे फाटा वढु बु. ते वढु खु. प्रजिमा १९ प्रजिमा २६ कि.मी. ०/१५० येथे मोठ्या पुलांचे बांधकाम आवश्यक असणे, रस्ते व पुल दळणवळणाच्या दृष्टीने महत्वाचे असल्याने सदर नमूद कामास नाबार्ड - २९ सन २०२४-२५ अंतर्गत मंजुरी मिळण्याची आवश्यकता असणे, पुल बांधकाम नसल्याने या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसणे, या ठिकाणी मोठ्या पुलाचे बांधकाम झाल्यास नागरिकांची अंतराची बचत होणार असणे, त्यामुळे सदर ठिकाणी पुल बांधणे अत्यंत गरजेचा असणे, याकरिता शासनाकडे वारंवार मागणी करुन कोणतीही कार्यवाही न होणे याकरिता शासनस्तरावरुन कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. कुणाल पाटील** |
| (६) | ६४९४ | १० | धुळे जिल्ह्यातील धुळे तालुक्यातील नेर महाल नूर नगर ग्रामीण मार्गावर पांझरा नदीवर पुलाचे बांधकाम करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होणे , शेतकऱ्यांना येत जाता होणारा त्रास थांबवा यासाठी सदर मागणी लक्ष्यात घेता या ठिकाणी पुलाचे बांधकाम करणेबाबत शासनाने केलेली वा करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. जयंत पाटील** |
| (७) | ६४५६ | १० | कराड ताकारी मार्गावर भरधाव वेगाने वाहने जात असल्याने अपघात होण्याची शक्यता आहे. वाहनांचे वेग कमी करण्यासाठी Rumbler Speed Breaker लावण्याची आवश्यकता आहे. कराड-तासगांव हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 266 असून या महामार्गाचे काँक्रीकरण करणे व ठिकठिकाणी पुलाचे बांधकाम करणे, महामार्गाला जोडणाऱ्या प्रमुख रस्त्यांचे जंक्शन सुधारणे इत्यादी कामे असे काम प्रस्ताव तयार करून शासनाने मंजूर केले. यापैकी वाळवा तालुका लांबी - 12.3 कि.मी 10.1 कि.मी काँक्रीट रस्ता 2.2 कि.मी - डांबरी रस्ता अंदाजे वाळवा तालुका हद्दीत खर्च -80 कोटी इतका खर्च आहे. सदर रस्त्याचे काम गेली 4 वर्षे झाली चालू आहे. परंतु अद्यापही काम पुर्ण झालेले नाही. सदर रस्त्याच्या कामाचा ठेकेदार काम सोडून गेल्याचे समजते. त्यामुळे वाळवा तालुक्यातील या रस्त्यांची कामे अद्याप झालेली नाहीत.1) महामार्गावर गाव निहाय बसथांबे उभारणे, दिशादर्शक फलक व |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | गावाची नावे दर्शविणारे फलक आदी लावणे आवश्यक 2) सदर रस्त्याला जोडणाऱ्या प्रमुख रस्त्यांचे जंक्शन कोठेही सुधारणा झालेली नाही. 3) या रस्त्यावर विद्युत पोल उभा करणे 4) रस्त्याच्या दोन्ही बाजूला आरसीसी गटर बांधणे 5) रस्त्याची उंची वाढली असल्याने शेतकऱ्यांची वाहने रस्त्यावर येण्यासाठी ठिकठिकाणी रॅम्प करणे गरजेचे आहे. 6) महामार्गावर वाहनांना वेगमर्यादा ठेवण्यासाठी रस्त्यावर रम्बलर स्पीड ब्रेकर बसविणे, सदरील कामे पुर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ६४५७ | १० | शिरटे हे वाळवा तालुकयातील कृष्णा नदीच्या काठावर वसलेले गाव आहे. या गावच्या नागरिकांना तालुक्याच्या ठिकाणी जागेसाठी दहा किलोमीटरचा जादा प्रवास करावा लागतो. तसेच शिरटे येथे ब वर्ग दर्जा प्राप्त असणारे सितादेवी मंदीर तिर्थक्षेत्र आहे. जर पुल बांधला तर सदर ठिकाणी भाविकांना जाणे सोयीचे ठरणार आहे. याबाबत गावकऱ्यांनी शिरटे खरातवाडी रस्त्यावर कृष्णा नदीवर पूल बांधून देण्याची मागणी केली आहे. त्या पुलाच्या बांधकामासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन द्यावा.याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ६४५८ | १० | किल्ले मच्छिंद्रगड हे वाळवा तालुक्यातील व सांगली जिल्ह्यातील प्रमुख तीर्थक्षेत्र तसेच ऐतिहासिक ठिकाण आहे. या ठिकाणी नाथ संप्रदायातील प्रमुख मच्छिंद्रनाथ यांची समाधी आहे. सदर ठिकाणी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथजी देखील येऊन गेले आहेत. त्यामुळे नाथ संप्रदायातील भाविक प्रत्येक रविवारी या गावात दर्शनासाठी येतात. तसेच महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज हे देखील या गडावर येऊन गेल्याची इतिहासात नोंद आहे. या गडावरुन संपूर्ण वाळवा तालुक्याचे दर्शन होते. या व अशा कारणाने या आधीच्या सरकारने किल्ले मच्छिंद्रगड गाव हे पर्यटन स्थळ म्हणून घोषित केले आहे. या ठिकाणी भक्तांसाठी व पर्यटकांसाठी भक्त निवास बांधणेचा प्रस्ताव शासनाने मंजूर केला आहे. तथापि ज्या ठिकाणी भक्त निवास बांधायचे आहे ती जागा महाराष्ट्र शासनाची आहे. निधी शासनाचा आहे. मागील दोन वर्षे झाले. सार्वजनिक बांधकाम सदर जागा ग्रामपंचायतीच्या नावे वर्ग केली तरच शासन खर्च करेल, असे म्हणत आहे. भक्त निवासाचे काम अद्याप का सुरु झाले नाही? म्हणजे शासनाचे नेमके काय धोरण आहे, हे समजू शकत नाही. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१०) | ६३९३ | १० | ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राअंतर्गत ब्रम्हपुरी,सावली व सिंदेवाही तालुक्यातील अतिवृष्टी व ग्रामीण भागातील व नदीला लागून असलेल्या सखल भागात पूर आल्यामुळे रस्ते खराब झाल्याने रहदारीस अयोग्य झालेले असणे, या सर्व रस्ते व पुलांची विशेष दुरुस्ती कार्यक्रमाचा प्रस्ताव मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर यांच्याकडे सादर करण्यात आलेला असणे, तसेच |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | याबाबतची मागणीही लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २/१०/२०२३ रोजी वा त्या सुमारास सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्या पत्राव्दारे केलेली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | ६३९५ | १० | ब्रम्हपुरी विधानसभा मतदारसंघातील बोरगांव भूती नाल्यावर पूल आणि रस्ता नादुरुस्त असल्याकारणाने स्थानिक नागरिक, प्रवाशांना प्रवास करताना अत्यंत त्रास सहन करावा लागत असणे, बोरगांव भूती नाल्यावर पूलाची अवस्था जीर्ण झाली असल्याने पावसाळयात या पूलावर वाहतूक करणे अत्यंत जिकीरीचे होत असणे, बोरगांव भूती नाल्यावरील पूल दुरुस्ती करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी, स्थानिक नागरिक यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे लेखी पत्रान्वये केलेली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ६३९७ | १० | राष्ट्रीय महामार्गात परिवर्तित झालेल्या चिमूर-वरोरा मार्ग मागील सात वर्षापासून रखडल्यामुळे वाहनधारक व प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत असणे, चिमूर ते वरोरा रस्त्याने दिवस-रात्र वाहनांची वर्दळ सुरु असणे, चिमूर ते वरोरा महामार्गाच्या दुरुस्तीबाबत अनेकदा आंदोलने झालेली असणे, या पूलाच्या कामासाठी बाजूने सिमेंट पाईप टाकून पर्यायी रस्ता तयार केल्याने या पाईपमधून पाणी जाण्यासाठी कमी जागा असल्यामुळे पाण्याच्या मार्गात मुरुम, माती, गिट्टी टाकण्यात आलेली असणे, त्यामुळे पाणी जाण्याचे मार्ग अडला असून केसीसी कंपनीच्या हलगर्जीपणामुळे पाणी थेट शेतकऱ्यांच्या शेतात जात असल्याने शेतकऱ्यांचेही अतोनात नुकसान होत असणे, चिमूर-वरोरा रस्त्याच्या दुरुस्तीबाबत अनेकदा लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे मागणी करण्यात येणे, या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची असलेली आवश्यकता व याबाबत शासनाची करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | ६४०१ | १० | चंद्रपूर जिल्ह्यातील चिखली ते लेंडीगुडा या मुख्य मार्गावरील वाघाईच्या घाटातील सिमेंट-कॉंक्रिट रस्त्याचे काम पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत दिड ते दोन वर्षापूर्वी करण्यात आलेले असणे, अल्पावधीतच या रस्त्यावर खड्डे पडलेले असून रस्ता उखडून रस्त्यावर गिट्टी पसरलेली असणे, या रस्त्याच्या दुरुस्ती व देखभाल दिनांक २६ जून २०२६ रोजी पर्यंत असतांनाही मागील चार महिन्यांपासून कंत्राटदार गायब असल्याचे माहे जून, २०२४ मध्ये निदर्शनास येणे, या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी यांनी वांरवांर शासनाकडे लेखी निवेदनाव्दारे तक्रारी करुनही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची उपाययोजना. |
| (१४) | ६४०४ | १० | चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी येथून पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या माहेर येथील नाल्यावरील पूल ४ वर्षापासून तुटलेला असल्याने या मार्गावरुन मोठया वाहनांचे ये-जा बंद पडलेली असणे, स्थानिक नागरिकांनी या विषयाबाबत ग्रामसभेत तक्रारी करुनही कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, माहेर नाल्यावरील जीर्ण व पूल तुटलेला |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | असल्याकारणाने खड्यात अडकून वाहनांचे मोठया प्रमाणावर नुकसान होत आहे, सबब, ब्रम्हपुरी येथून माहेर या नालयावरील पूलाचे बांधकाम तातडीने करण्याबाबत लोकप्रतिनिधी, स्थानिक नागरिक यांनी शासनाकडे केलेली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१५) | ६४०५ | १० | चंद्रपूर जिल्ह्यातील नवरगाव-चिखलगाव मार्गावर अनेक ठिकाणी खड्डे पडल्याने अपघात होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरलेली असणे, नवरगाव वरुन नागभीड, ब्रम्हपुरी, नागपूर, भंडारा शहराकडे जाण्यासाठी नवरगाव चिखलगाव हा मुख्य मार्ग असून या मार्गाने अनेक प्रवासी, शालेय विद्यार्थी प्रवास करीत असणे, सबब सदर रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१६) | ६४०६ | १० | जिवती तालुक्याला जोडणारा गडचांदूर-माणिकगड पहाड-नगराळामार्गे जिवती हा मार्ग कमी अंतराचा व वळणदार घाटाचा असणे, तालुक्यातील दळणवळणाच्या दृष्टीने माणिकगड घाटातील रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्याऱ्या कंत्राटदाराने वळणदार घाटात फक्त गिट्टी टाकून इतर काम माहे मे च्या दुसऱ्या आठवड्यापासून बंद ठेवल्याने या मार्गावरुन प्रवास करणे धोक्याचे झालेले असणे, या रस्त्याचे काम अत्यंत आवश्यक असल्याने तातडीने करण्याबाबतची मागणी स्थानिक नागरिकांनी, लोकप्रतिनिधीनी शासनाकडे केलेली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१७) | ६४०७ | १० | कल्याण-मुरबाड रोड माळशेज घाटाकडून अहमदनगरला जोडणाऱ्या रस्ता पडलेल्या खड्ड्यामुळे अत्यंत निकृष्ट झाल्यामुळे प्रवाशांना आणि नागरिकांना प्रवास करताना अडचणीचा सामना करावा लागत असणे, हा रस्ता कल्याण मुरबाड मार्गे अहमदनगरपर्यंत चौपदरीकरण करण्याचे प्रस्तावित असून या रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण सेंच्युरी कंपनीपासून म्हारळ, वरप आणि कांबापर्यंत करण्यात आले आहे,तसेच अनखर पाडा गोवेली गाव ते सृष्टी रिसॉर्ट पर्यंतचा मातीचा रस्ता निकृष्ट असल्याने या रस्ता दुरुस्तीची करण्याची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मागील २ वर्षापासून अत्यंत धीम्या गतीने सुरु असल्याचे माहे जून २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेले असणे, या रस्त्याचे काम जलदगतीने करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१८) | ६४०८ | १० | भिवंडी-वाडा-मनोर या ६४ कि.मी. महामार्गाच्या रस्त्याचे काम मे.सुप्रीम कंपनीला देण्यात येणे, मे. सुप्रीम कंपनीकडून भिवंडी-वाडा या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने रस्त्यावर अनेक ठिकांणी पडलेल्या खड्ड्यामुळे मोठया प्रमाणावर अपघात होऊन अनेक नागरिक मृत्यूमुखी पडलेले असणे, या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या मे.सुप्रीम कंपनीवर कारवाई करण्याबाबतची मागणी गेल्या अनेक वर्षापासून लोकप्रतिनिधी, नागरिकांनी शासनाकडे केलेली असणे परंतू शासनाकडून |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | कोणतीही ठोस कार्यवाही अद्यापी न करणे, सबब भिवंडी-वाडा-मनोर या महामार्गाच्या रस्त्यांचे काम अत्यंत निकृष्ट करणाऱ्या मे. सुप्रीम कंपनीवर कारवाई करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१९) | ६३०७ | १० | मुंबई-गोवा महामार्गाचे काम पूर्ण होण्याआधीच पळस्पे ते पोलादपुर दरम्यान मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याचे दिसून येणे, सदरचे खड्डे ०३ फुट लांब आणि ०९ ते १० इंच खोल तर नागोठणे, वाकण, सुकेळी खिं, कोलाड, इंदापूर आणि माणगाव याठिकाणी सिमेंट कॉंक्रिटच्या रस्त्याला तडे गेले असल्याने महामार्गाच्या दयनीय अवस्थेबाबत एका जागरुक नागरिकाने रस्ता दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात आलेली असणे, मागील १५ वर्षापासून मुंबई-गोवा महामार्गाचे काम निष्कृष्ट दर्जाचे झाल्याने रस्त्याची पुर्नबांधणी करण्याची आवश्यकता असून पत्रव्यवहार करुनही त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी प्रशासनाच्या उदासनीतेमुळे वाहन चालकांमध्ये शासनाप्रति निर्माण झालेला असंतोष याबात शासनाने तातडीने लक्ष घालून रस्त्याचे काम हाती घेऊन सदरील रस्त्याची पुर्नबांधणी करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२०) | ६३०८ | १० | महामार्ग सेवा अधिक बळकट करण्यासाठी मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाच्या नागपूर-चंद्रपूर, भंडारा-गडचिरोली आणि नागपूर-गोंदिया असा तिन्ही महामार्गांचा विस्तार करण्याचा शासनाच्या विचाराधीन असणे, या महामार्गाच्या विस्तारामुळे संपूर्ण महाराष्ट्रात रस्त्यांचे जाळे पसरले जाणार असणे, याचा सर्वात जास्त फायदा शेतकरी व्यवसायीक व प्रवाशांना होणार असून त्यामुळे वेळेची बचत होणार असणे, या तिन्ही महामार्गांच्या कामासाठी एमएसआरडीसीने ११ टप्प्यात निविदा मागविल्या असणे, मागविलेल्या सदर निविदा खुल्या करुन अंतिम विस्ताराच्या कामाला सुरुवात करण्याच्या नियोजनाबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२१) | ६३०९ | १० | अहमदपूर व्हाया राणी सावरगाव ते पालम (जि.परभणी) हा रस्ता हायवे करण्यात यावा, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व रहिवाशांनी केली असणे, परंतु सदरचा रस्ता हायवे झाला नसणे, सदरच्या रस्तयावर मोठया प्रमाणावर वाहतूक निर्माण झाली असणे, नॅशनल हायवे करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२२) | ६३१० | १० | आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव (पूर्व) मुंबई येथील आरे दुग्ध वसाहतीतील अंतर्गत रस्ते खराब झाले असून रस्त्याची दयनीय स्थिती झाली असणे, रस्त्याची देखभाल व दुरुस्ती करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, या संदर्भात मा. उच्च न्यायालयाने अंतर्गत रस्ते दुरुस्तीचे आदेश दिले असणे, तथापि त्याकडे संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असणे परिणामी स्थानिक रहिवाशात निर्माण झालेला तीव्र |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (२३) | ६३११ | १० | ठाणे ते वडप या रस्त्याचे रुंदीकरणाचे काम सुरु असून अपूर्ण अवस्थेत असणे कंत्राटदार काम संथगतीने करीत असणे, रस्त्याची कामे अपूर्ण असल्यामुळे नाशिक हायवे व वडपे रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण होत असणे, कंत्राटदारावर कठोर कारवाई करणे व ठेकेदाराला काळया यादीत टाकण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक नागरिकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (२४) | ६३१२ | १० | उक्कडगांव -भालकुडकी फाटा ते सिरसम ता. पालम जि, परभणी या रस्त्यावर पूल बांधणे व रस्त्याचे डांबरिकरण करणे, रस्ता अत्यंत खराब झाला असून वाहतूकीस अयोग्य असणे, त्याचा नाहक त्रास प्रवाशांना व स्थानि रहिवाशाना होत असणे, रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण तातडीने करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक नागरिकात निर्माण झालेला तीव्र असंतोष व व शासनाप्रती निर्माण झालेली चिडीची भावना शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (२५) | ६३८४ | १० | तारळ चौक ( ता.राजापूर, जि.रत्नागिरी) अंतर्गत तारळ हरचळी ते गवळदेव मंदिर असा रस्ता करण्याची आवश्यकता असणे, रस्त्याअभावी भाविकांची व ग्रामस्थांची गैरसोय होत असणे, रस्ता अत्यंत खराब झाला असणे, रस्ता वाहतुकीस अयोग्य असणे, त्याचा त्रास स्थानिक रहिवाशांना होत असणे, सदरच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (२६) | ६३८५ | १० | मौ.बरबडी ते सांगवी (ता.पालम,जि.परभणी) या रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, संबंधित अभियंता याकडे दुर्लक्ष करीत असणे, गत अनेक वर्षापासून ग्रामस्थांनी मागणी केली असणे, रस्ता वाहतुकीस अयोग्य असणे, मा.अधिक्षक अभियंता यांनी या रस्त्याचे परिक्षण करणे गरजेचे असणे, मात्र याकडे संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एच-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५९, सार्वजनिक बांधकामे**<br>**रूपये:- २३,६०,६८,१९,०००/-**<br>**श्री. विनोद निकोले** |
| (२७) | ६३५३ | १०० | राज्यातील मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गक्र.48वर जि.पालघर ता.वसई ससुनवघर ते तलासरी तालुक्यातील अच्छाड पर्यंतरस्त्याचे काँक्रीटकरण करण्याचे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | कामसुरू असल्याची बाब निदर्शास येणे, यामहामार्गावर काम करताना कोणत्याही प्रकारचे सुरक्षानियम पाळण्यात आलेले नसल्याने सतत अपघात होऊन अनेक निष्पापलोकांचे जीवजात असणे,पहिल्याच पावसात हायवेवर वसईहद्दीत हारस्ता खचल्याने काही अवजड वाहनांची चाके रस्त्यातच रुतली यामुळे परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झालीअसणे, याराष्ट्रीय महामार्गाच्या रस्त्याची तात्काळदुरुस्ती करतानाच कंत्राटदारांकडून पुरेशी काळजी घेतली गेली नसल्याने तसेच पर्यायीमार्गही अपुरेअसुन यासाठी लागणाऱ्या निधीचाही अपव्यय होत असतानाही त्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असणे, कामाच्याठिकाणी सूचनाफलक नसल्याने रात्रीच्यावेळी वाहनचालकांचा गोंधळ उडत असणे, डहाणूचारोटी ते आंबोलीदरम्यान कॉंक्रिटीकरण्याचे कामसुरू असून दोन्ही लेनवर काम सुरू असल्यामुळे वाहतूक कोंडी तासंनतास होत असणे, चारोटीउड्डाणपूल, महालक्ष्मी, धानिवारी यागावांदरम्यान रात्रीच्या वेळी नेहमीच प्रचंड वाहतूककोंडी होते त्यामुळे दोन्ही लेन एकाचवेळी काम न करता एकलेन वाहतुकीसाठी खुली ठेवावी अशी वाहनचालकाची मागणी असणे,मुंबईअहमदाबाद मार्गावरील चारोटी उड्डाणपणाखालून डहाणू नाशिक राज्यमार्ग जातो या उड्डाणपुलाखाली दोन्ही बाजूसपडलेल्या खड्ड्यांमुळे इथून प्रवास करणे कठीण होणे, रात्रीच्यावेळी अनेक वाहनेओव्हरटेक करतात त्यावेळी वाहतूककोंडी होऊन मोठ्याप्रमाणात अपघात घडत असणे,महामार्गप्रशासन व ठेकेदाराने अपूर्णअसलेल्या सेवा रस्त्याची अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करून देऊन रुग्णवाहिका तसेच प्रवासात अडकलेल्या लहानमुलांना वृद्धनागरिकांना जनतेला पुरेशी प्रमाणात सुरक्षाव्यवस्था देण्याचे गरजअसणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अमिन पटेल** |
| (२८) | ६४७६ | १० | मुंबईसह राज्यातील विविध ठिकाणी शासकिय निवासस्थाने असणे, या शासकिय निवासस्थानांची दुरावस्था झालेली असणे, बहुतांश निवासस्थानाची मागील बऱ्याच काळापासून दुरुस्ती झालेली नसणे, या निवासस्थानांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असणे, या निवासस्थानांचा लवकरात लवकर पुर्नविकास करण्याची स्थानिक नागरिकांची मागणी असणे, यावर शासनाने करावयाची  कार्यवाही व उपायोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (२९) | ६३९९ | १० | सर्वे नं.६४/२ब] चराटे म्युनिसिपल हद्द (ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग) हा प्लॉट जुना गोवा-मुंबई महामार्ग लगत असणे व सध्याचा राज्य महामार्ग असून या महामार्गालगत गटाराची नाळी तुटलेली व नादुरुस्त अवस्थेत असणे, त्यामुळे लगतच्या प्लॉट मधील जमिनीची माती वाहून जात असणे, जमिनीची झीज होत असणे, परिणामस्वरुप त्याचा नाहक त्रास प्लॉट धारकाला सहन करावा लागत असणे, सदरचे गटार तातडीने दुरुस्त करण्याची नितांत आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | दुर्लक्ष, स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एच-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३०, कामगार, सेवायोजन व कौशल्य विकास**<br>**रूपये:- २३,६०,६८,१९,०००/-**<br>**श्री. संजय जगताप** |
| (३०) | ६४६४ | १० | ता.पुरंदर,जि.पुणे येथील उपविभाग, सार्व.बांधकाम विभाग सासवड येथे अनेक वर्षापासून अधिकारी व कर्मचारी यांची आस्थापनेवर नियुक्ती न झाल्याने पदे रिक्त असणे, याकारणे येथील मंजूर विकास कामे होण्यास अडथळा निर्माण होत असणे, त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढत असणे, त्यात जनतेच्या जिवीतेची व आर्थिक नुकसान होत असणे, सदरची कामे वेळेत पूर्ण न झाल्याने शासनाचेही आर्थिक नुकसान होत असणे, याकरीता उपविभाग, सार्व.बांधकाम विभाग, सासवड येथील आस्थापनेवरील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अमिन पटेल** |
| (३१) | ६४८३ | १० | मुंबई महानगर पालिकेच्या स्वच्छ मुंबई – सुंदर मुंबई या उपक्रमात सफाई कर्मचाऱ्यांचा मोठा वाटा असणे, सफाई कर्मचारी वारसा हक्क पद्धतीने पिढ्यान पिढ्या सफाई कामगार म्हणून कार्यरत असणे, विशेषतः कोविड काळात त्यांनी दिलेल्या सेवेला विशेष महत्व असणे, सेवेत कार्यरत असेपर्यंत त्यांना महापालिकेच्या वसाहतीमध्ये घरे राहण्यासाठी उपलब्ध होणे, सेवानिवृत्त झाल्यानंतर सदर घर खाली करण्यासाठी त्यांच्यावर कारवाई करण्यात येणे, सेवानिवृत्ती नंतर त्यांची मुंबईमध्ये राहण्याची पर्यायी व्यवस्था नसणे, त्यामुळे सफाई कामगारांना मालकी हक्काची घरे मिळवीत अशी मागणी सफाई कर्मचाऱ्यांकडून वारंवार होत असणे, या मागणीच्या पाठपुरावा करण्यासाठी अधिवेशन काळात वारंवार मी प्रश्न उपस्थित करणे, सफाई कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची घरे मिळवीत यासाठी शासन स्तरावर योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन सन २०२२ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री यांनी सभागृहात मला देणे, परंतु अद्यापही त्यावर कोणतीही कारवाई झालेली नसणे, आश्रय योजना व श्रमसाफल्य योजनेत असणाऱ्या विरोधाभासामुळे सफाई कर्मचारी संभ्रमात असणे, त्यामुळे सफाई कामगार वर्गात पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (३२) | ६३०६ | १० | मुंबई उपनगरात मालाड पश्चिम भूमी पार्क, जनकल्याण नगर येथे शासनाचे सामान्य रुग्णालय असून या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाने कर्मचाऱ्यांच्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | निवासस्थानासाठी इमारत बांधली असणे, महानगरपालिकेने सदरची इमारत कोविड-१९च्या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व क्वारंटाईन सेंटर करण्यासाठी माहे मार्च,२०२० मध्ये ताब्यात घेतली असणे, आजतागायत सदरची इमारत महानगरपालिकेच्या ताब्यात असणे, महानगरपालिकेने इमारतीतील निवासस्थानाची मोडतोड केली असणे, अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी, मुंबई यांनी उप आयुक्त व सहाय्यक आयुक्त पी/उत्तर विभाग म.न.पा.ला वारंवार कळविले असणे, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधीने सहाय्यक आयुक्त, पी/उत्तर विभाग, म.न.पा. व अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक विभाग, अंधेरी (प.) मुंबई यांना वारंवार पत्राद्वारे कळविण्यात आले असणे, मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाने व म.न.पा.ने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरीकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- १,३४,६०,३५,४८,०००/-**<br>**श्री. सुभाष धोटे** |
| (३३) | ६३८७ | १० | राजूरा (जिल्हा चंद्रपूर) विधानसभा मतदार संघातील ग्रामीण भागातील अंतर्गत रस्ते मोठ्या प्रमाणात खराब झाले असून मोठमोठे खडे पडल्याने वारंवार अपघात होत आहे. या अपघातामूळे लोकांचा बळी जात असून अनेक जण जखमी होत आहे. त्यामूळे ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरूस्तीकरण करण, नवीन रस्त्याचे बांधकाम करणे याकरीता कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग चंद्रपूर यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील राजूरा तालुक्यातील वरूर- विरूर - धानोरा- आर्वी रस्ता प्रजिमा-६२ किमी. ०/०० ते ५/०० मध्ये रूंदीकरण व मजबुतीकरण करणे, चंद्रपूर जिल्ह्यातील राजूरा तालुक्यातील वरूर- विरूर - धानोरा - आर्वी रस्ता प्रजिमा-६२ किमी. १२/०० ते १७/८०० मध्ये रूंदीकरण व मजबुतीकरण करणे, चंद्रपुर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील राजुरा सास्ती कोलगांव कढोली निली धिडशी मार्डा जैतापुर भोयेगांव भारोसा इरई सांगोडा ते रामा- ३१७ ला जोडणाऱ्या प्रजिमा-१७ ची सुधारणा करणे. किमी १०/५०० ते १३/५००, चंद्रपुर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील राजुरा सास्ती कोलगांव कढोली निली धिडशी मार्डा जैतापुर भोयेगांव भारोसा इरई सांगोडा ते रामा-३१७ ला जोडणाऱ्या प्रजिमा-१७ ची सुधारणा करणे. किमी १४/००० ते २३/०००, चंद्रपुर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील लोनी - देवघाट चिंचोली गौरी रस्ता प्रजिमा ४७ किमी २९/५०० ते ३०/५०० रस्त्याचे बांधकाम करणे, चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील राजुरा- चनाखा- धानोरा अंतरगांव- अन्नुर ते राज्य सिमा (प्रजिमा १६) रस्त्यावरील सा.क्र. २०/०२० लहान पूलाचे बांधकाम करणे, चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील राजुरा - चनाखा- धानोरा- अंतरगांव- अन्नुर ते राज्य |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सिमा (प्रजिमा १६) रस्त्यावरील सा.क्र. ३५/५२५ लहान पूलाचे बांधकाम करणे, चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील वरुर- विरुर- धानोरा- आर्वी (प्रजिमा-६२) रस्त्यावरील सा.क्र. ३/२०० लहान पूलाचे। बांधकाम करणे, चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील वरुर- विरुर- धानोरा- आर्वी (प्रजिमा-६२) रस्त्यावरील सा.क्र. ५/७०० लहान पूलाचे बांधकाम करणे, चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील वरुर- विरुर- धानोरा- आर्वी (प्रजिमा-६२) रस्त्यावरील सा.क्र. ५/७०० लहान पूलाचे बांधकाम करणे, या कामाचे रितसर प्रस्ताव पाठवून सुध्दा या विकास कामांना अघापही मंजूरी मिळालेली नसणे या विकासकामांना मंजूरी मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (३४) | ६३८८ | १० | राजूरा (जिल्हा चंद्रपूर) विधानसभा मतदार संघातील ग्रामीण भागातील अंतर्गत रस्ते मोट्या प्रमाणात खराब झाले असून मोठमोठे खडे पडल्याने वारंवार अपघात होत आहे. या अपघातामूळे लोकांचा बळी जात असून अनेक जण जखमी होत आहे. त्यामूळे ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरूस्तीकरण करण, नवीन रस्त्याचे बांधकाम करणे याकरीता कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग चंद्रपूर यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यातील लोणी देवघाट नारंडा कढोली आवाळपूर हिरापूर पालगाव तळोदी निमणी चिंचोली प्रजीमा -47 या रस्त्यावर साखळी क्र. 5/400 मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे, चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यातील लोणी देवघाट नारंडा कढोली आवाळपूर हिरापूर पालगाव तळोदी निमणी चिंचोली प्रजीमा -47 या रस्त्यावर साखळी क्र. 8/650 मध्ये मोठ्या पुलाचे बांधकाम करणे, चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यातील लोणी देवघाट नारंडा कढोली आवाळपूर हिरापूर पालगाव तळोदी निमणी चिंचोली प्रजीमा -47 या रस्त्यावर साखळी क्र. 7/00 मध्ये मोठ्या पुलाचे बांधकाम करणे, चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यातील गडचांदूर-नोकारी-जिवती प्रजिमा-13 या रस्त्यावर साखळी क्र. 9/145 मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे, चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यातील भोयेगाव भरोसा विरूर सोनुर्ली कारवाई संगोडा (प्र.जि.मा.17) या रस्त्यावर साखळी क्र. 28/400 मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे, चंद्रपुर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यातील सावंगी बाबुलगांव राळेगांव वडकी वणी वनोजा अंतरगांव गडचांदुर देवाडा रस्त्याची सुधारणा करणे रामा- 317 किमी २१३/०० ते २१६/०००, चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यातील लोणी देवघाट नारंडा कढोलो आवाळपूर हिरापुर पालगाव तळोदी निमणी चिचोली रामा-३१७ या रस्त्यावर साखळी क्र. २०८/०० मध्ये मोठ्या पुलाचे बांधकाम करणे, चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यातील कुरली-कुरई-ढाकोरी-बोरी-कोडशी-कोरपना या रस्त्यावर साखळी क्र. १३/२०० मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे, चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यातील सावंगी बाबुलगाव राळेगाव वडकी वणी वनोजा गडचांदूर देअवाडा या रस्त्यावर साखळी क्र. 217/600 मध्ये लहान उंच पुलाचे बांधकाम करणे, चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यातील |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सावंगी बाबुलगाव राळेगाव वडकी वणी वनोजा गडचांदूर देअवाडा या रस्त्यावर साखळी क्र. 212/200 मध्ये लहान उंच पुलाचे बांधकाम करणे. या कामाचे रितसर प्रस्ताव पाठवून सुध्दा या विकास कामांना अघापही मंजूरी मिळालेली नसणे या विकासकामांना मंजूरी मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (३५) | ६३८९ | १० | राजूरा (जिल्हा चंद्रपूर) विधानसभा मतदार संघातील ग्रामीण भागातील अंतर्गत रस्ते मोट्या प्रमाणात खराब झाले असून मोठमोठे खडे पडल्याने वारंवार अपघात होत आहे. या अपघातामूळे रिपराध लोकांचा बळी जात असून अनेक जण जखमी होत आहे. त्यामूळे ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरूस्तीकरण करण, नवीन रस्त्याचे बांधकाम करणे याकरीता कार्यकारी अभियंता कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग चंद्रपूर यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्यातील जानाळा पोंभुर्णा गोंडपिपरी धाबा पोडसा (रा.मा-369) ला जोडणाऱ्या गोंडपिपरी नगराच्या वळणमार्गाचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. (उर्वरीत काम ), चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्यातील जानाळा सुशी पोंभुर्णा बोरगांव गोंडपिपरी धाबा पोडसा ते राज्य सीमा (रा.मा-369) रस्त्यावर गोंडपिपरी गावामध्ये किमी. 38/930 ते 39/500 मध्ये सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे, चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्यातील कोठारी तोहगांव आर्वी (प्रजिमा-18) रस्त्यावर किमी 14/500 ते 15/500 तोहोगांव गावा मध्ये रूंदीकरणासह सिमेंट कॉंक्रीट रस्ता व नालीचे बांधकाम करणे, चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्यातील वरुर धानोरा आर्वी लाठी सोनापूर (देशपांडे) वेडगांव रस्ता ते रा. मा. 369 (प्रजिमा-62) रस्त्याचे किमी 20/00 ते 22/500 व 38/00 ते 42/600 मध्ये सुधारणासहित संलग्णीत कामे करणे, चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्यातील वरूर धानोरा आर्वी लाठी सोनापुर (दे.) वेडगाव (प्रजिमा-62) रस्त्यावरील किमी 28/400 लाठी ते किमी 38/360 सोनापुर (दे.) गावात सिमेंट कॉंक्रीट रस्ता, नाली व पेवींग चे बांधकाम करणे, चंद्रपुर जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्यातील कोठारी कुडेसावली तोहगांव आर्वी रोड (प्रजिमा-18) वर किमी 8/800 मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे, चंद्रपुर जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्यातील कोठारी कुडेसावली तोहगांव आर्वी रोड (प्रजिमा-18) वर किमी 16/460 मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे, चंद्रपुर जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्यातील वरूर धानोरा आर्वी परसोडी लाठी सोनापुर (दे.) वेडगाव (प्रजिमा-62) रस्त्यावर किमी 21/800 मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे, चंद्रपुर जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्यातील वरूर धानोरा आर्वी परसोडी लाठी सोनापुर (दे.) वेडगाव (प्रजिमा-62) रस्त्यावर किमी 23/300 मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे, चंद्रपुर जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्यातील वरूर धानोरा आर्वी परसोडी लाठी सोनापुर (दे.) वेडगाव (प्रजिमा-62) रस्त्यावर किमी 24/900 मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे, चंद्रपुर जिल्ह्यातील गोंडपिपरी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | तालुक्यातील वरूर धानोरा आर्वी परसोडी लाठी सोनापुर (दे.) वेडगाव (प्रजिमा-62) रस्त्यावर किमी 40/820 मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे. या कामाचे रितसर प्रस्ताव पाठवून सुध्दा या विकास कामांना अघापही मंजूरी मिळालेली नसणे या विकासकामांना तातडीने मंजूरी मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (३६) | ६३९० | १० | राजूरा (जिल्हा चंद्रपूर) विधानसभा मतदार संघातील ग्रामीण भागातील अंतर्गत रस्ते मोठ्या प्रमाणात खराब झाले असून मोठमोठे खडे पडल्याने वारंवार अपघात होत आहे. या अपघातामूळे लोकांचा बळी जात असून अनेक जण जखमी होत आहे. त्यामूळे ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरूस्तीकरण करणे, नवीन रस्त्याचे बांधकाम करणे याकरीता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग चंद्रपूर यांनी चंद्रपूर जिल्हयातील जिवती तालुक्यातील गडचांदुर नौकारी पांढरवणी नागापुर टेकामांडवा प्रजिमा-१३ वर किमी २५/७५० मध्ये अरूंद व बुडीत पुलाऐवजी दुपदरी उंच पुलाची पुर्नबांधणी करणे, चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील गडचांदूर नौकारी गढपांढरवणी नागापूर धोंडार्जुनी टेकामांडवा रस्त्याची सुधारणा करणे प्र. जि. मा. १३ किमी १८/००० ते २०/७००, चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील गडचांदूर नौकारी गढपांढरवणी नागापूर धोंडार्जुनी टेकामांडवा रस्त्याची सुधारणा करणे प्र. जि. मा. १३ किमी २३/१०० ते २५/०० या कामाचे या कामाचे रितसर प्रस्ताव पाठवून सुध्दा या विकास कामांना अद्यापही या विकासकामांना तातडीने मंजूरी मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. जयंत पाटील** |
| (३७) | ६४६२ | १० | पेठ सांगली राष्ट्रीय महामार्ग १६६अ चे काम प्रस्तावित आहे. तथापि सदर महामार्गावर वाळवा फाटा, गोटखिंडी, बावची, कारदंवाडी,तुंग, कसबे डिग्रज, गाताडवाडी, तुजारपुर याठिकाणच्या गावातील नागरिकांना रस्ता ओलांडून जाणेसाठी अंडर बायपास करणे आवश्यक आहे. त्याची तरतूद अंदाजपत्रकात नसल्याचे अधिकारी सांगत आहेत. तरी त्याची तरतूद करावी. सदर कामामुळे रस्त्याची उंची वाढणार असल्याने वाढलेल्या उंचीमुळे रस्त्यालगतच्या शेतकऱ्यांना रस्त्यावर येता येत नाही. त्यामुळे शेतामध्ये तयार होणारे पीक बाहेर कसे काढायचे आहे मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत शेतकऱ्यांनी रस्त्यावर येणेकरिता रॅम्प उभारणेची मागणी केली. या कामासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३८) | ६४६३ | १० | इस्लामपूर विधानसभा मतदारसंघातील कसबे डिग्रज-मौजे डिग्रज नवीन पुल ते कदमवाडी,सांगलीवाडी हा प्रमुख जिल्हा मार्ग असून कृष्णा नदीला समांतर रस्ता आहे. सदर रस्त्याचा वापर करुन जिल्हयाच्या ठिकाणी कमी वेळेत सहजरित्या पोहोचता येते. सदर रस्ता वारंवार निर्माण होणाऱ्या पूर परिस्थितीवर पाण्याखाली |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | गेल्याने अत्यंत खराब झालेला आहे. सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याची वारंवार मागणी करुन देखील अद्यापही रस्त्याचे काम झालेले नसणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : ४ जुलै, २०२४**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सार्वजनिक बांधकाम विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई